एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
मो.न.9422660077

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र शुक्रवार ३० ऑगस्ट २०२४ आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ वर्ष २ रे अंक १५ पाने ४ किंमत ४ रुपये

# दाजी एक दिवस तुम्हाला घोडे लावणार, मनोज जरांगे यांचा खणखणीत इशारा

## फडणवीस-महाजनांवर गंभीर आरोप

धनगर समाजाने मोठा उठाव केला, पण पंचक मोचक ( गिरीश महाजन ) धनगर आंदोलन मोडीत काढले एसटी आरक्षण आंदोलन मोडले मराठा आरक्षण मोडीत काढले. देवेंद्र फडणवीस हा बधिर डोक्याचा आणि क्रूर गृहमंत्री फडवणीस यांनी जातीय वादी पोलिसांकडून लाठीचार्ज करायला लावला. मी देवेन्द्र फडवणीस याला झोपवल्या शिवाय सोडणार नाही, मी बदला घेणार. माझ्यावर एसआयटी नेमण्यात आली, माझ्या खिशात आठ आणे नाहीत माझ्या खिशात कोणी हात घालत नाही, असे ते म्हणाले.

## रावसाहेब दानवे यांच्यावर नाराजी

रावसाहेब दानवे यांनी माझ्यावर केस केली. मी त्यांना आतापर्यंत दादा म्हणत होतो. मी नेहमी त्यांचा आदर करतो. त्यांनी माझ्यावर मार्चमधील केस आता केली आहे. काय करशील. तुमचं कोणी तरी उभं राहील ना कोणी तरी. मग दाखवतो कचका. कर कुणालाही उभं, असं इशारा जरांगे पाटील यांनी दिला.



मराठा आरक्षण आंदोलनाला आज एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्ताने या आंदोलनाची समीक्षा करण्यात आली. त्यावेळी मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा लक्ष्य केले. फडणवीस यांच्यामुळे राज्यात जातीय राजकारण होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. त्यांनी फडणवीस यांच्यामुळेच मोठ्या समाजाचे नुकसान होत असल्याचा दावा केला आहे. येत्या निवडणुकीत काय होणार याचे गणितच त्यांनी मांडले. मराठे का केवळ दांडे हाती धरण्यासाठी आहेत का? मराठ्यांना गृहीत धरु देऊ नका, असा घणाघात त्यांनी केला.

## दाजी घोडे लावणार

**लाडक्या बहिणीला 1500 देतो, मग भाशाला काय आणि दाजीला काय? दाजी एक दिवस तुम्हाला घोडे लावणार आहे. आम्हाला कर्ज माफी, मालाला भाव, शेताला पाणी, 24 घंटे लाईट द्या. आम्हाला काहीही नको. आरक्षण दिल्यावर मराठा, धनगर मोठा होईल. दाजी आता रुम्हणे घेऊन उभा आहे. 1500 दिले मग, फडवणीस ने शेत विकून पैसे दिले का, असा सवाल त्यांनी केला. आरक्षण दिले की राजकीय बोलणे बंद. फडवणीस यांनी किती नेरेटिव्ह करु द्या, असे जरांगे पाटील म्हणाले.**



# लोकशाही मार्गाने चालू असलेले माजी सैनिकाचे उपोषण पोलिसांनी तोडण्याचा केला प्रयत्न
## माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे १५ ऑगस्ट पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करत आहेत उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे दिनांक 15 ऑगस्ट पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेले आहेत, त्यांनी 15 ऑगस्ट या दिवशी पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे यांना काळा झेंडा दाखवून समोरासमोर निषेध व्यक्त केला होता. ही गोष्ट लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जण सन्मान यात्रेमध्ये माजी सैनिक, यात्रेला काळे झेंडे दाखवतील, गोंधळ घालतील अडवतील म्हणून प्रतिबंधात्मक पाऊल म्हणून त्यांचे उपोषण पोलीस प्रशासनाकडून दिनांक 29 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 11:00 च्या दरम्यान तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. ज्यामध्ये माजी सैनिक यांनी असे म्हटले आहे की पोलीस प्रशासन हे बळजबरीने माझे उपोषण सोडत तरी पोलीस प्रशासनाने त्यांना नोटीस बदाम शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे हजर राहण्यास सांगितले होते. त्यांना पोलीस प्रशासनाने शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये बळजबरीने घेऊन जाण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी नकार दिला मुळे पोलीस त्यांना घेऊन जाऊ शकले नाही लोकशाही मार्गाने मी आंदोलन करत आहे मला न्याय मिळावा अशीच मागणी ते करत असल्याचे पहावयास मिळाले. माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे विविध आंदोलनामुळे चर्चेत असतात , यावेळी त्यांनी जोपर्यंत प्रशासनाकडून न्याय मिळत नाही तोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

# अलहुदा उर्दू हायस्कूल बीड येथे राष्ट्रीय खेळ दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी द्वारा संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल शहेनशाह नगर बीड येथे राष्ट्रीय खेळ दिनानिमित्त विविध खेळांविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी शालेय परिपाठानंतर शाळेचे मुख्याध्यापक डॉ.सिराज खान आरजू यांनी खेळ दिनानिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतरवर्ग यांना शुभेच्छा दिल्या व शाळेतील क्रीडा शिक्षक शेख अब्दुल हमीद यांचा राष्ट्रीय खेळ दिनानिमित्त शाळेच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले . यावेळी आरोग्य व क्रीडा शिक्षक शेख अब्दुल हमीद यांनी राष्ट्रीय खेळ दिवस व विविध खेळांविषयी सविस्तर माहिती दिली यावेळी ते म्हणाले की हा दिवस महान फील्ड हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी




29 ऑगस्ट रोजी साजरा केला जातो, क्रीडा आणि शारीरिक क्रियाकलापांच्या महत्त्वावर जोर देण्यासाठी आणि भारतीय हॉकीमधील मेजर ध्यानचंद यांच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी खेळ दिवस साजरा केला जातो. खेळांनी तंदुरुस्त शरीर, स्पंदनशक्ती, समता, ताकद आणि लवचिकता ह्या गुणांचा विकास करते. खेळाच्या व्यायामांनी खूप मोठ्या प्रमाणात लोहपात,मोटापा, डायबिटीज, हृदयरोग आणि इतर आरोग्य समस्यांचे आणि स्ट्रेसचे धोके कमी केले जातात. खेळाचे दुसरे महत्वपूर्ण लाभ मानसिक विकासाच्या क्षेत्रात स्थानिकता करणे आहे. खेळ शालेय जीवनात अत्यंत महत्वाचे आहे. खेळाच्या नियमित प्रयोगाने मनुष्यांना शारीरिक आणि मानसिक रूपात आरोग्य, तंदुरुस्ती, संतुलित विकास, सामरिक क्षमता, समुदायी सहभाग आणि नैतिकता ह्या प्रमुख महत्वांचे लाभ देखील मिळते.खेळ केवळ शारीरिक फायदे प्रदानकरणारी नाही, तर त्याने मानसिक स्वास्थ्याचे प्रमाणात वाढवते. खेळ दिनानिमित्त शाळेत विवीध खेळांचे उत्स्फूर्तपणे आयोजन करण्यात आले सर्व खेळांमध्ये सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्व कार्यक्रम व खेळांचे आयोजन क्रीडा शिक्षक शेख अब्दुल हमीद यांच्या देखरेखखाली झाले त्यांना शाळेतील सहशिक्षक शेख मोइजोद्दीन , मोहम्मद रफीक, सय्यद रहबर शिक्षकेत्तर कर्मचारी मसूद शेख, युनूस खान आदींनी सहकार्य केले. या वेळी अलहुदा उर्दु प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मोमीन जफर मसूद व प्राथमिक शाळेचे शिक्षकवर्ग आदिंची उपस्थिती होती.

## स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज येथे तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न



केज । प्रतिनिधी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष श्री. अंकुशराव इंगळे साहेब यांच्या हस्ते झाले कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. कोकीळ सर प्रमुख पाहुणे श्री. चाटे सर शिक्षण विस्तारधिकारी केज शाळेचे सचिव श्री. गदळे सर उपस्थित होते यावेळी मेजर ध्यानचंद यांचे प्रतीमेचे पुजन करण्यात आले व राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड क्रीडा संयोजक यांनी केले या कार्यक्रमाला मार्गदर्शन श्री. श्री. चाटे सर व श्री. गदळे सर यांनी केले वेळी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त खेळाडूना क्रीडा विषयक व व्हॉलीबॉल खेळाविषयी खेळाडूना महिती दिली यावेळी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शाळेतील खेळाडूचा सत्कार प्रमुख पाहुणेच्या हस्ते करण्यात आला या स्पर्धला क्रीडा शिक्षक श्री. कोंथबीरे सर, श्री शिंदे सर, श्री. जाधव सर, श्री. ढाकणे सर, श्री. जोगदंड सर श्रीमती गिरी मॅडम,श्रीमती सोनार मॅडम,उपस्थित होते.या स्पर्धेला पंच म्हणून श्री. सोनवणे सर यांनी काम पाहिले कार्यक्रमाला क्रीडा शिक्षक यांचा सत्कार श्री विनोद गुंड सर क्रीडा संयोजक यांनी केला या स्पर्धेला तालुक्यातील अनेक शाळेतील खेळाडूनी सहभाग नोंदवला .

# नगरपालिकेच्या मुख्याधिकार्‍यांकडून फाटक बसवण्यास टाळाटाळ
## नागरिक व भक्तांची होतेय गैरसोय-अँड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

वैद्यनाथ मंदिर परिसरात दक्षिणमुखी गणेश मंदिरासमोर आणि वैद्यनाथ मंदिराजवळ लोखंडी कायमस्वरूपी फाटक बसवावे याकरिता मुख्याधिकाऱ्यांना मित्र मंडळाच्या असंख्य पदाधिकाऱ्यांच्या वतीने निवेदन दिले परंतु आश्वासन देऊनही त्याची पूर्तता मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्याकडून अद्याप झाली नाही त्यामुळे या रोडवर होणारी जड वाहनांची ट्रॅफिक मुळे भक्त आणि नागरिक परेशान होत आहेत त्यांची गैरसोय होत आहे. पालिकेच्या मुख्याधिकारी यांनी त्वरित कायमस्वरूपी लोखंडी कोणतेही कारणे न देता बसवावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी मुख्याधिकारी यांना केली आहे.

मुख्याधिकाऱ्यांना याबाबतचे निवेदन असंख्य मित्र मंडळाच्या



पदाधिकाऱ्यांच्या वतीने नगरपालिकेमध्ये देण्यात आले होते या संदर्भात अनेक वृत्तपत्रांमध्ये बातम्याही प्रसिद्ध करण्यात आल्या परंतु दोन दिवसांमध्ये प्रश्न सोडवू असे आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी दिले त्यात राज्य कृषी महोत्सव परळीत असल्याने त्यामध्ये अधिकारी गुंतले असता आता मात्र कृषी प्रदर्शन संपताच त्यांनी मुख्याधिकाऱ्यांची भेट घेतली आणि चर्चा केली असता दोन दिवसांमध्ये प्रश्न मार्गी लावू असे नुसते आश्वासन दिले परंतु पंधरा दिवस उलटून गेल्यानंतरही त्याची दखल मुख्याधिकाऱ्यांनी घेतली नाही. ट्रॅफिक या रोडवर जास्त प्रमाणावर होते त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागतो नागरिकांनाही याचा फटका बसतो आहे या सर्व बाबीचा विचार करून मुख्याधिकारी साहेबांनी त्वरित फाटक बसवावेत अशी मागणी त्यांनी केली आहे

# १ सप्टेंबरपासून शहरातील घंटागाड्या होणार बंद ; पंधरा महिन्यापासून नगरपालिकेने बिलच दिले नाही

### स्वच्छतेमुळेच सलग चार वर्षापासून पारितोषिक

शहर स्वच्छतेध्यमध्ये मागील चार वर्षापासून देशभरात अव्वल ठरत आहे. त्यामुळेच आतापर्यंत ५० हजार ते १ लाख लोकसंख्या असलेल्या व ब दर्जा नगर पालिकेमध्ये स्वच्छतेत सातत्य कायम टिकून आहे. त्यामुळेच या नगर पालिकेचा गौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन केंद्रीय नगर विकास मंत्री व तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलेला आहे. या नगर पालिकेला स्वच्छतेत आतापर्यंत १५ कोटी रूपयाचे पारितोषिक मिळालेले आहे.

हिंगोली:- (प्रतिनिधी) शहरातील १७ प्रभागामधील कचरा उचलणे व त्याच्या वाहतुकीचे कंत्राट अमरावती येथील बेरोजगार क्षितीज नागरीक सेवा सहकारी संस्थेला दिले असून त्यावर जवळपास १५० कंत्राटी कामगार काम करीत आहेत. मागील १५ महिन्यापासून संस्थेचे जवळपास ५ कोटी रूपये देयके थकल्याने १ सप्टेंबर पासून कामबंद ठेवण्यात येणार असून या संदर्भात नगर पालिकेला कंत्राटदाराने लेखी पत्रही दिले आहे. या शहरामध्ये १७ प्रभाग असून या प्रभागातील कचरा उचलणे व त्याच्या वाहतुकीचे कंत्राट अमरावती येथील बेरोजगार क्षितिज नागरीक सेवा सहकारी संस्थेला देण्यात आले आहे. सन २०२२ पासून या संस्थेतर्फे स्वच्छतेची कामे करून डपींग ग्राऊंडवर हा कचरा नेवून टाकला जातो. या स्वच्छतेच्या कामाकरीता शहरात २२ घंटागाड्या असून त्यावर ४४ कंत्राटी कामगार व ५ ट्रॅक्टर २५ कर्मचारी तसेच ६० स्वच्छता कर्मचारी व इतर पर्यवेक्षक असे जवळपास १५० कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना संस्थेकडून वेतन दिले जाते. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून घनकचरा व्यवस्थापनाचा निधी मिळणे आवश्यक आहे. मागील १५ महिन्यापासून केंद्र व राज्य शासनाकडून निधी देण्यात आला नाही. त्यामुळे संस्थेचे जवळपास ५ कोटी रूपये देयके थकले आहेत. या संदर्भात कंत्राटदाराने अनेक वेळा नगर पालिकेकडे पत्र देऊनही देयके उपलब्ध होत नाहीत; परंतु कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांकडून कंत्राटदाराकडे वेळोवेळी तगादा



लावला जात असल्याने संस्थेने त्यांच्या जवळील निधीतून कामगारांचे वेतन अदा केले; परंतु आता संस्थेकडेही कामगारांच्या वेतनासाठी पैसे उपलब्ध नाही. परिणामी काही कामगारांनी काम सोडल्यामुळे त्याचा परिणाम दैनंदिन कामावर जाणवत आहे. त्यामुळे नाईलाजास्तव संस्थेने २७ ऑगस्टला नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. मंजुराचे वेतन करण्यासाठी व वाहनातील डिझेल पुरवठा करण्याकरीता संस्थेकडे पैसे नाहीत. परिणामी कर्मचाऱ्यासह त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. त्यासाठी देयके अदा न झाल्यास स्वच्छतेच्या कामावरील कामगार काम बंद ठेवतील त्यामुळे नाईलाजास्तव १ सप्टेंबर पासून कामबंद ठेवण्या संदर्भात नगरपालिकेला कंत्राटदाराने लेखी पत्र दिले आहे . या संदर्भात नगर पालिका प्रशासनाकडे संपर्क साधला असता घनकचरा व्यवस्थापनाकरीता केंद्र व राज्य शासनाकडून प्रत्येक ५० टक्के निधी दिला जातो; तो निधी मिळाला नसल्याने वेतन थकले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# दिनेश भाई खैरे यांच्या हस्ते व्याघ्रेश्वर मंदिरात महाअभिषेक सोहळा संपन्न

## श्रावणी सोमवार निमित्त भाविक भक्तांनी घेतला दर्शनाचा लाभ

पेण प्रतिनिधि

पेण तालुक्यातील महाल मिऱ्या डोंगरावर ऐतिहासिक शिव मंदिर आहे. या शिवमंदिरात सोमवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी श्रावणी सोमवार निमित्त ग्रूप ग्रामपंचायत मिऱ्या डोंगर यांच्या वतीने महाअभिषेक सोहळा संपन्न झाला. हा महाअभिषेक भाजप तालुका उपाध्यक्ष दिनेश खैरे दाम्पत्य यांच्या हस्ते पार पडला.यावेळी सकाळी १० वाजता अभिषेक,११ वाजता चांदेपट्टी ग्रामस्थांचे भजन, १२ वाजता मान्यवरांचे स्वागत आणि १ ते ३ वाजता महाप्रसाद असा कार्यक्रम झाला.या महाप्रसादाचा




५०० भाविकांनी लाभ घेतला. यावेळी नवनिर्वाचित खासदार धैर्यशील पाटील , निलिमाताई पाटील माजी अध्यक्ष रा.जि.प., दिनेश भाई खैरे उपाध्यक्ष पेण तालुका भाजप, वृषाली खैरे माजी सरपंच म.मि. डोंगर, जनार्दन लांगी अध्यक्ष व्याघ्रेश्वर देवस्थान ट्रस्ट, नरेश शिंदे उपाध्यक्ष व्याघ्रेश्वर देवस्थान ट्रस्ट, संतोष वाघमारे अध्यक्ष पाबळ गण पंचायत समिती, सोनल उघडे सरपंच ग्रुप ग्रामपंचायत म. मि.डोंगर, रमेश भस्मा उपसरपंच, जनार्दन भस्मा मा सरपंच, राजू आखाडे खजिनदार व्याघ्रेश्वर देवस्थान ट्रस्ट, भाई खैरे युवा नेते, हरी भस्मा माजी उपसरपंच, जयराम ठाकरे सामाजिक कार्यकर्ता लक्ष्मण शिद मा. उपसरपंच,विठ्ठल जेधे, ज्ञानेश्वर दळवी, मधुकर भिकावले मा.पोलीस पाटील, जनार्दन पवार पोलीस पाटील, संतोष मांढरे, अशोक पिंगळा, सोमा शिद, महादू खाकर, बाळू उघडा, रामा खाकर यावेळी उपस्थित होते.

## उरण शहरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची नागरिकांची मागणी उरण शहरात कुत्रा चावण्याच्या घटनेत झाली वाढ.

### मात्र नगर परिषदेकडून कोणतेही उपाययोजना नाही नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण



उरण । विठ्ठल ममताबादे उरण शहरात कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून उरण मधील विविध रस्त्यावर, चौकात, नाक्या नाक्यावर मोठ्या प्रमाणात कुत्रे उभे असलेले दिसतात. मात्र हे कुत्रे शांत न बसता येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना विनाकारण नाहक हा त्रास देत आहेत.तर उरण शहरातील अनेक नागरिकांना या भटक्या कुत्र्यांनी चावा देखील घेतला आहे.उरण नगर परिषदेचे दुर्लक्ष होत असल्यामुळे उरण शहरा मध्ये नागरिकांना कुत्रे चावण्याच्या घटनेत वाढ होत आहे अशी नागरिकांचे म्हणणे आहे.उरण शहरातील देऊळवाडी शंकर मंदिर येथे तसेच कामठा रोड व कामठा परिसर, पालवी हॉस्पिटल परिसर आदी ठिकाणी कुत्रे मोठ्या प्रमाणात असून या कुत्र्यांना पकडून बाहेर कुठेतरी योग्य सुरक्षित स्थळी सोडून देण्यात यावे.व कुत्र्यांची नसबंदी करण्यात यावी जेणेकरून भविष्यात कुत्र्यांची संख्या वाढणार नाही अशी मागणी उरण मधील विविध नागरिकांनी केली आहे तसेच सामाजिक कार्यकर्ते रवि गुरव यांनीही उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्याकडे पत्र व्यवहाराद्वारे केली आहे.पत्रव्यवहार व नागरिकांची मागणी या गोष्टी कडे नगर परिषद कोणत्या भूमिकेतून बघते हे पाहणे महत्वाचे ठरेल. नागरिकांची मागणी व नागरिकांनी केलेले पत्रव्यवहाराची दखल नगर परिषद घेते की नाही या बाबत नागरिकांच्या नजरा नगर परिषदेच्या भूमिकेकडे लक्ष ठेवून आहेत.उरण शहरात एखाद्याला कुत्रा चावला. आणि त्यात त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याला जबाबदार कोण असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.



## सौ.सुषमा उमेश लोढा यांच्या ११ उपवासाची पचकावणी

# जैन धर्माचा चातुर्मासाचा एक महीना पुर्ण

**(चौसाळा प्रतिनिधी)**

चौसाळा येथिल पावन भुमीमध्ये परमपुज्य श्री दिलीपकवरजी म.सा. यांच्या सुशिष्या स्वाध्याय प्रेमी परमपुज्य श्री कुसुमकंवरजी म.सा. आणी प्रवचन प्रभाविका परमपुज्य श्री अरूणप्रभाजी म.सा.आधी ठाणा २ यांच्या सानिध्या मध्ये चौसाळ्याचे उधोगपती श्री उमेश शेठ लोढा यांच्या पत्नी सौ.सुषमा उमेश लोढा यांनी निंरकांर ११ उपवास केले असून त्यांची पचकावणी शुक्रवार दि.३०ऑगस्ट रोजी चौसाळा येथे होणार आहे.चौसाळ्या सारख्या छोटया गावामध्ये जैन समाजाचे कमी घरे असताना २४ वर्षानंतर चातुर्मासचा योग आला सध्या एकासना आंबील,वास,तेला,आठाई अशा बरयाच तपस्या चालू आहेत. शुक्रवारी सकाळी ८ वाजता त्यांच्या निवास्थाना वरून वरघोडा मिरवणुक निघून जैन स्थानकात पोहोचणार आहे.९ वाजता त्यांची पंचकावणी होणार आहे.चातुर्मास चे मार्गदर्शक सुभाषचंद बेदमुथा,कचरू शेठ लोढा आणी अशोक लोढा आहेत पंचकावणी झाल्यानंतर गौतम प्रसाद ठेवलेला आहे. अशी माहीती चातुर्मास कमिटी अध्यक्ष आनंद नहार,संदेश खिंवसंरा ,नितीन लोढा,वृषभ धोका,उमेश लोढा,सतीष कोचर,आनंद लोढा,भुषण खिंवसंरा,मयुर नहार,रोशन खिंवसंरा,रमण कोचर ,राजेश लोढा,पारस धोका,अनुप बेदमुथा,विनोद धोका,संतोष लोढा,देंवेद्र बोरा आणी वर्धमान श्रावक संघ चौसाळा यांनी ही माहीती दिली आहे.

## चौसाळा येथिल गुरुदत्त माध्यमिक व उच्चमाध्यमिक विधालयात श्रीकृष्ण जन्माष्मी निमित्त गोपाळकाला व दहीहंडी कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा

(चौसाळा प्रतिनिधी) गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा येथे संस्थेचे अध्यक्ष लोकनेते डॉ. बाबुरावजी जोगदंड यांच्या अध्यक्षतेखाली श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त गोपाळकाला व दहीहंडीच्या कार्यक्रमाचे मोठ्या जल्लोषात आयोजन करण्यात आले.. श्रीकृष्णाने बाळ गोपाळ व सवंगड्यांना घेऊन गोवर्धन पर्वत उचलला या एकीचं व संघटनेचे बळ आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये पाहायला मिळतं . अशा सण-उत्सवामधून माझ्या शाळेतली मुलं संस्कारक्षम नागरिक व संस्कृतीचे पा ईक घडतील अशी अपेक्षा डॉक्टर साहेबांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष सयाजी (बाप्पा )



शिंदे ,शालेय समिती सदस्य श्री संभाजी (आबा) जोगदंड ,श्री उमेश राव आंधळे ,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक( बाबा) कुचेकर तसेच उमेश राव जोगदंड, घरत नाना , महेश रावजी कदम व प्रतिष्ठित नागरिक व बहुसंख्येने पालक वर्ग उपस्थित होते. शाळेतील शिक्षक श्री राठोड सर, घोडके सर, मोठे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील मुलींनी गोपिकांच्या वेशामध्ये विविध गीतांवर टिपरी नृत्य केले. विद्यालयातील लेझीम पथकाने श्री केदार सर व साबणे मॅडम यांच्या मार्गदर्शनातून पथकाचे कौशल्य दाखवलं. प्राथमिक गटातील इयत्ता पाचवी ते सातवीच्या गोविंदा पथकाने श्री गुरव सर व लिमकर सर यांच्या प्रेरणेतून दहीहंडी फोडण्याचा कसोशीने प्रयत्न केला. माध्यमिक गटातील आठवी ते दहावी वर्गातील गोविंदा पथकाने श्री वैद्य सर व बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दहीहंडी फोडण्यात यश मिळवले. शाळेचे मुख्याध्यापक श्री श्रीमंत चौधरी सर यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या या कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहकारी श्रीमती टाच तोडे बाई, संजय सोनवणे, धनंजय वाघमारे, विश्वनाथ पवार यांनी परिश्रम घेतले.

# सुवर्ण प्राशन संस्कार




दि.30 ऑगस्ट शुक्रवार रोजी सुवर्ण प्राशन संस्काराचे आयोजन केले आहे तरी आपल्या वय वर्ष 1 महिना ते 16 वर्ष वयोगटातील मुलांना घेऊन यावे आणि याचा लाभ घ्यावा

वेळ : सकाळी 10 ते 3 संध्याकाळी 7 ते 9

स्थळ : ओजस आयुर्वेद चिकित्सालय, शरदचंद्र विद्यालय जवळ, पालवण रोड, बीड

# दुर्मिळ कॅन्सर झालेल्या रुग्णांसाठी आशेचा किरण अपोलो हॉस्पिटल्सने सुरु केले रेअर-केयर क्लिनिक

उरण प्रतिनिधी ): दुर्मिळ प्रकारच्या कॅन्सरमुळे निर्माण होणारी अनिश्चितता आणि भीती यांनी ग्रासलेल्या रुग्णांसाठी योग्य निदान आणि देखभाल मिळवणे एक मोठे आव्हान असते. अपोलो हॉस्पिटल्स रेअरकेयर क्लिनिकमध्ये आम्ही त्यांची ही अडचण दूर करण्यासाठी सज्ज आहोत. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईतील हे विशेष क्लिनिक तयार करण्यात आले आहे. दुर्मिळ आणि आव्हानात्मक कॅन्सरचे निदान बऱ्याचदा चुकीचे केले जाते, परिणामी उपचार देखील चुकीचे केले जातात, रुग्णांना उपचारांमधून अपेक्षित परिणाम मिळत नाहीत, अशा रुग्णांना सर्वसमावेशक देखभाल पुरवण्याचे काम क्लिनिक मध्ये केले जाते. लाखामध्ये अवघ्या सहा केसेस ज्या कॅन्सरच्या असतात, त्यांना दुर्मिळ मानले जाते, एकूण कॅन्सर केसेसमध्ये यांचे प्रमाण २०% इतके लक्षणीय आहे. यांचे २०० पेक्षा जास्त प्रकार ओळखण्यात आले आहेत. दुर्मिळ कॅन्सर झालेले रुग्ण एकटे पडतात, त्यांच्या निदान प्रक्रिया आणि उपचार नियमांबाबत फारशी माहिती उपलब्ध नसल्याने त्यांच्या




मनात अनिश्चितता असते. हाडांचे व सॉफ्ट टिश्यू सार्कोमा (देसमोईड ट्युमर), त्वचेचा कॅन्सर, गरोदरपणात होणारे कॅन्सर, लैंगिकदृष्ट्या अल्पसंख्यांकांना होणारे कॅन्सर (एलजीबीटीक्यू+ कॅन्सर), न्यूरोएंडोक्राइन ट्यूमर्स (एनईटी), आनुवंशिक कॅन्सर आणि कुटुंबामध्ये, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीमध्ये जीन्समार्फत होणारे कॅन्सर, किशोरवयीन मुले किंवा तरुणांना होणारे कॅन्सर दुर्मिळ कॅन्सर प्रकारात मोडतात. सहव्याधींसह वृद्धापकाळात कॅन्सर होणे, रोगप्रतिकारशक्ती कमजोर पडणे, सहव्याधी असलेले आणि पॉली पिल थेरपीजचे रुग्ण, असामान्य लक्षणे किंवा स्तन, गायनॅकॉलॉजिकल, फुफ्फुसे, गॅस्ट्रोइंटेस्टीनल, डोके आणि मानेच्या सामान्य कॅन्सरमध्ये दुर्मिळ हिस्टोलॉजीज दिसणे या ऑन्कोलॉजीसाठी आव्हानात्मक बाबी आहेत.

# परळी नगर परिषद कार्यलयातील अधिकारी कर्मचारी जुनी पेंशन लागूसह विविध मागण्यासाठी बेमुदत संपावर

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

जुनी पेशन योजना व इतर विविध मागण्यासाठी नगर परिषद / नगर पंचायत कर्मचारी यांनी राज्यव्यापी संप पुकारला आहे. यासंपामध्ये परळी वैजनाथ येथील नगर परिषद कार्यालयातील सर्व कर्मचारी सहभागी झाले आहेत. तसेच घोषणा देऊन शासनाचे निषेध व्यक्त केला जात आहे. जो पर्यंत आमच्या मागण्यापूर्ण होत नाही तोपर्यंत हा बेमुदत संप सुरु राहणार असल्याची प्रतिक्रिया संप कर्त्यांनी दिली आहे. संपावर कर्मचारी गेल्यामुळे नगर परिषद सर्व विभागातील कामकाज ठप्प होऊन नागरिकांची गैरसौय झाली होती.



राज्यातील सर्व नगर परिषद नागरिकांच्या मूलभूत समस्यांचे निवारण करण्याचे शासनाचे महत्त्वपूर्ण कार्य ज्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांमार्फत होते. त्या कर्मचाऱ्यांना अद्याप पर्यंत 2005 साली लागू झालेली dcps पेन्शन योजना आणि 2015 साली लागू झालेली NPS पेन्शन योजना प्रत्यक्षात लागू झालेली नाही. शासनाचे विविध विभाग नगरपरिषद कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारीच मानायला तयार नाही ही अत्यंत खेदाची बाब असून या विरोधात महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेने 29 ऑगस्ट 2024 पासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. नगरपरिषद/नगरपंचायतीमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या समस्या व मागण्या पुढीलप्रमाणे जुनी पेंशन योजना लागू करणे किंवा नविन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणी करणे., राज्य संवर्ग पदे सातवा वेतन आयोग अधिसूचनेत पदांचा समावेश करुन सेवार्थ नंबर मिळणे., सहायक अनुदान एक महिना आगाऊ देणे, सातव्या वेतन आयोग फरक व मागील महागाई फरक रक्कम मिळणे, नगरपरिषद कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना १०, २०,३० लागू करणे, राज्य संवर्ग सर्वसाधारण बदल्यांमधील जाचक अटी वगळणे, पदोन्नतीतील कोट्यातील रिक्त पद तात्काळ भरणे, मुख्याधिकारी विभागीय स्पर्धा परिक्षा तात्काळ MPSC मार्फत घेणे, सेवानिवृत्ती उपदान व रजा रोखीकरण शासनाकडे भरणे व स्थानिक कर्मचारी निवृत्ती रक्कमांचे अनुदान मिळणे, धारणाधिकार सह नियुक्ती व बदली पदस्थापना करणे, नियोजित शासकीय संघटना प्रस्तावानुसार संघटनेची नोंदणी करण्यात यावी. तसेच नगरपरिषद/ नगरपंचायतीमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या मागण्या, वेतन शासन लेखा कोषागार मार्फत करण्यात यावे. संवर्ग सेवेतील श्रेणी-अ. पदास गट-ब (राजपत्रित) दर्जा आणि श्रेणी-ब पदास गट-ब (अराजपत्रित) दर्जा मिळणे, सहायक आयुक्त/ मुख्याधिकारी गट-ब (राजपत्रित) पदावर ६०% जागा राज्य संवर्ग पदोन्नतीने भरण्यात याव्यात., कर व प्रशासकीय, अग्निशामक आणि स्वच्छता निरीक्षक सेवा संवर्ग वेतनश्रेणी ४२००/एस-१३ करावी., अभियांत्रिकी संवर्गातील अभियंता

## नगर परिषद सर्व विभागातील कामकाज ठप्प, नागरिकांची गैरसौय

यांना इतर विभाग प्रमाणे पदनाम व वेतनश्रेणी लागु करावी. अ वर्ग नगरपरिषद CAFO पदावर संवर्ग सेवेतील लेखा अधिकारी नियुक्ती करावी., पाणीपुरवठा, मलनिस्सारण व स्वच्छता संबर्ग यांची वाढीव पदे निर्माण करावी. संगणक, अग्निशमन व विद्युत या संवर्गाची पदे नगरपंचायतींमध्ये निर्माण करावी., क वर्ग नगरपरिषदांना उपमुख्याधिकारी हे पद निर्माण करावे, राज्य संवर्ग श्रेणी-क पदांवर २५% जागा नगरपरिषद कर्मचारी यांची स्वतंत्र परिक्षा किंवा सेवा ज्येष्ठताने भरावी. संवर्ग अधिकाऱ्यांचे विविध प्रश्न मांडले. जुनी पेन्शन योजना व संवर्गाचे मूलभूत समस्या/मागण्यावर शासन स्तरावर मोठे दुर्लक्ष झाले असल्याने 29 ऑगस्टपासून सर्व संघटनासह संपात सहभागी होण्याचा निर्णय एकमताने यावेळी घेण्यात आला. सदरच्या मूलभूत समस्या व मागण्यांवर विनंती करण्यात येते की, समस्या व मागण्यांवर तात्काळ कार्यवाही व्हावी. ही नम्र विनंती. या संपात परळी वैजनाथ नगर परिषद कार्यालयीत सर्व कर्मचारी सहभागी झाले आहेत. यामुळे नगर परिषद विभागातील सर्व कामकाज ठप होते. यांमुळे नागरिकांची गैरसोय झाली होती. यावेळी नगर परिषद कार्यालयातील उपमुख्याधिकारी संतोष रोडे, शंकर साळवे, अजय कलंत्री व इतर कर्मचारी उपस्थितीत होते.

# हनुमान वस्तीवरील रस्त्या प्रकरणी मंडळ अधिका-याची मनमानी

## १३ दिवसा पासुन अहवाल गुलदस्त्यात

**येवता । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिवाचीवाडी अंतर्गत हनुमान वस्तीवरील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी वरीष्ठ अधिका-यांनी मंडळ अधिकारी सुहास डोरले यांची नियुक्ती केली होती.या प्रकरणी मंडळ अधिकारी हे बणवाबणवी करून वरिष्ठ अधिका-यांची दिशाभुल करीत आहेत.... केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील हनुमानवस्ती साठी तत्कालीन तहसीलदारांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे रस्ता देण्याऐवजी या रस्त्याला विरोध करणा-यांशी संगणमत करून मंडळ अधिकारी मनमानी कारभार करीत आहेत.तहसिलदार यांचे कडुन पुढील तारीख घेण्यासांठी मंडळ अधिकारी यांनी 16 ऑगस्टं रोजी प्रत्यक्ष घडलेल्या कामकाजाचा अहवाल सादर करणे गरजेचे आसतानाही मंडळ अधिकारी यांनी 15 दिवस झाले तरी अद्याप अहवाल तहसीलदार यांना सादरच केला नाही. यावरुन मंडळ अधिकारी हे आपल्या कर्तव्यात कसुर करीत असल्याचे सिद्ध झाले आहे. अधिका-यांच्या आदेशाचे पालन नकरता मनमानी कारभार करुन अधिका-याच्या आदेशाला केराची टोपली दाखवित आहेत.




### 15 दिवसापासून अहवाल सादर होईना...

वरीष्ठ अधिका-यांच्या आदेशावरुन 16 ऑगस्ट रोजी नायब तहसिलदार आशा वाघ,मंडळ अधिकारी सुहास डोरले,तलाठी उत्रेश्वर घुले,भुमी अभिलेखचे रविंद्र विभुते यांनी हनुमान वस्ती येथे येऊन केलेल्या कामकाजाचा अहवाल तहसीलदार यांना सादर करणे आवश्यक आसताना अद्याप अहवाल प्राप्त झाला नसल्याची माहीती तह.जमा-२ च्या श्रीमती कावळे मॅडम व तहसिलदार सचिन देशपांडे यांनी सदर प्रतिनीधीशी बोलताना दिली,तर मंडळ अधिका-यांशी संपर्क साधला आसता तरप्रकरणी मंडळ तहसिल कार्यालयाला अहवाल सादर केल्याची ते खोटी माहीती देत आहेत.

### मंडळ अधिकारी बदलण्याची मागणी...

उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी सांगुनही मंडळ अधिकारी सुहास डोरले हे राजकीय दबावापोटी अतिक्रमणाला विरोध करणा-या शेतक-यांशी संगणमत करुन त्यांना अभय देऊन वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता कर्तव्यात कसुर करीत आहेत . अधिका-यांची दिशाभुल करीत आहेत,त्यामुळे या प्रकरणी त्यांच्या ऐवजी दुस-या मंडळ अधिका-याची नियुक्ती करुन रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात यावे किंवा तत्कालीन तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे नदीच्या बाजुने रस्ता उपलब्ध करुन देण्याची मागणी उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांचेकडे हनुमान वस्ती येथील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# वसंतराव भागवत आश्रम शाळा सोनीमोहा येथील विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये घवघवीत यश

## विद्यार्थी विद्यार्थिनींच्या कलागुणांच्या माध्यमातून यश मिळते-गणेश मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील वसंतराव भागवत आश्रम शाळा सोनीमोहा येथील विद्यार्थी विद्यार्थिनी सातत्याने आपले कलागुण दाखवण्यासाठी विविध स्पर्धेमध्ये भाग घेत असतात , धारूर येथील राजमाता जिजाऊ कॉलेज या ठिकाणी क्रीडा विभागामार्फत घेणाऱ्या येणाऱ्या कुस्ती स्पर्धा पार पडल्या ,या ठिकाणी तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा घेण्यात आले होत्या, यावेळी तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा मध्ये वसंतराव भागवत आश्रम शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी बाजी मारली ,मध्ये वयोगट, , 17. मुले प्रथम आलेले विद्यार्थी, कृष्णा



गणेश मुंडे, साठे बालासाहेब आप्पा, तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा वयोगट 14, प्रथम आलेल्या मुली, अश्विनी हनुमंत मुंडे प्रथम, धायतिडक राजकन्या प्रथम, स्वाती सदाशिव नाईकवाडे, प्रथम, तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा वयोगट 17 मुली, प्रथम आलेले विद्यार्थीनी, वेदांती संदीप दराडे, आधी विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे घवघवीत यश, यावेळी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, संस्थापक अध्यक्ष श्री सुमंत डुबे ,संस्थेचे अध्यक्ष श्री संदीप खिलौजी, उपाध्यक्ष श्री रुपेश भैय्या ,सचिव श्री दीपक डुबे, मुख्याध्यापक कुलकर्णी सर, डुबे सर, वाघमारे सर, चव्हाण सर, कापसे सर, यादव सर, मुळे सर, बुरके सर, अविनाश मुंडे सर, क्रीडा विभाग गणेश मुंडे सर, राऊत मामा कर्मचारी आदी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बीड दौरा संपन्न



बीड, 29 :- उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड दौऱ्यावर असून सायंकाळी त्यांचे आष्टी तालुक्यातून पूणे येथे प्रयाण झाले.तत्पुर्वी सकाळी बीड येथे राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालक मंत्री धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनीही उपमुख्यमंत्री श्री पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर उपमुख्यमंत्री श्री पवार यांनी शिवाजी चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास अभिवादन करून त्यांच्या पक्षाच्या जनसन्मान यात्रा लाडकी बहिणीसोबत संवाद , शेतकरी मेळावा अशा बीड तसेच आष्टी तालुक्यातील कार्यक्रमांना सुरवात केली. आष्टी येथुन पुणे आंतराराष्ट्रीय विमानतळावर प्रयाण केले तेथुन विमानाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे रवाना झालेत.

# केज तालुक्यात साथीच्या आजाराने नागरिक त्रस्त!

## राजेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची संख्या वाढली

## डॉक्टरांकडून रुग्णांवर वेळेत उपचार होत असल्याने नागरिकांमध्ये समाधान



केज । सचिन भालेराव सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने कधी पाऊस तर कधी ऊन तर कधी थंडी अशा बदलत्या हवामानामुळे केज तालुक्यातील नागरीकाना साथीच्या आजाराने हैराण केले आहे. तर राजेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून एरवीच्या बाह्य रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ झाली असल्याने या ठिकाणचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक मुंडे यांनी प्रा.आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असुन सर्व कर्मचारी अहोरात्र रुग्णांची सेवा करत आहेत. या बाबत अधिक माहिती अशी की सध्या सर्वत्र पावसाळ्याचे दिवस असल्याने केज तालुक्यात उन पावसाचा खेळ सुरु आहे. तालुक्यात म्हणावा तेवढा पाऊस पडत नसला तरी वातावरणात झालेल्या बदलामुळे व्हायरल इन्फेक्शन प्लस बॅक्टेरीया यापासून उद्भवणारे साथीचे आजार मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. यामध्ये सर्दी, खोकला थंडी,ताप अशा आजाराने नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे राजेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक मुंडे यांनी आरोग्य केंद्रातील आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असुन आपली सर्व यंत्रणा कामाला लावली आहे. तसेच राजेगाव या प्राथमिक आरोग्य केंद्रात एरवी ६० ते ७० असणारी बाह्य रुग्णांची संख्या आता १५० च्या वर जावु लागली आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक मुंडे यांनी राजेगाव या प्रा.आ.केंद्रात मुबलक प्रमाणात औषध साठा उपलब्ध केला असुन रुग्णांनी न घाबरता या ठिकाणी उपचार घ्यावेत. असे आवाहन जनतेला केले आहे. या रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक मुंडे , वैद्यकीय अधिकारी डॉ.विशाल ढेंगळे, औषध निर्माण अधिकारी डी.एम. मोराळे, प्रयोग शाळा वैज्ञानिक अधिकारी अमोल गालफाडे, आरोग्य सेविका श्रीमती. ढाकणे, श्रीमती. ससाने, श्रीमती. डिस्ले, श्रीमती.सपकाळ, आरोग्य सेवक जाधव जे.पी., रुग्णवाहिका चालक मोमीन शेख व गरकल यांचेसह राजेगाव प्रा.आ.केंद्रातील सर्व कर्मचारी अहोरात्र मेहणत घेवुन रुग्णांची सेवा करत आहेत.

# पुन्हा निवडून द्या, सर्व योजना पुढची पाच वर्ष चालवू-ना.अजितदादा पवार





## दुचाकी रॅलीने वेधले लक्ष; हॉटेलमध्ये केला दादांनी नाश्ता!

ना.धनंजय मुंडे, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीडमध्ये हेलीपॅडवर आगमन होताच ना.अजित पवार यांच्यासमवेत नेत्यांचे स्वागत केले. शहरातून बाईक रॅली निघाली. या रॅलीत शेकडो तरूण-तरूणी सहभागी झाले होते. यावेळी फुलांची उधळण करण्यात आली. अजितदादांनी रस्त्यात व्यापारी बांधवांसह अल्पसंख्याक समाजाचे निवेदन स्विकारले. दौऱ्यात सुरक्षा व्यवस्था बाजूला ठेऊन प्रसिद्ध श्री हॉटेलमध्ये जाऊन नाश्ता केला. त्यांच्या या साधेपणाने उपस्थितांमधून कौतूक झाले.

## अजितदादांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सुटले : डॉ.योगेश क्षीरसागर

जनसन्मान यात्रेतून ना.अजित पवार हे सर्वसामान्य घटकातील महिला, पुरुषांसह तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. पक्षात प्रवेश केल्यानंतर एक वर्षाच्या कमी कालावधीतही अजित पवारांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले. तसेच मराठा भवनासाठी निधी देण्यासह उर्दू घर, शेतकऱ्यांसाठी सोलार योजना, गावांमध्ये व्यायामशाळा, बीड शहरातील प्रलंबित रस्ते आणि पाणी पुरवठा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याच्या मागण्या डॉ.क्षीरसागर यांनी केल्या.

## राष्ट्रवादीचे चार, महायुतीचे सहा आमदार असतील-धनंजय मुंडे

पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी यावेळी लाडकी बहीण योजनेत बीड जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे सांगितले. या सरकारने शेतकऱ्यांना वीज बिल माफी दिली. सामान्यांसाठी सरकारची तिजोरी खाली केली. त्यामुळेच येत्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात राष्ट्रवादीचे चार तर महायुतीचे सहा आमदार असतील अशी ग्वाही दिली.

बीड (प्रतिनिधी)
दि.29 : आगामी विधानसभा निवडणुकीत बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांना पाठबळ द्यावे. आम्हाला पुन्हा निवडून दिल्यास पुढची पाच वर्ष सध्या चालू असलेल्या लाडकी बहिण, शेतकऱ्यांसाठीच्या सर्व योजना सक्षमपणे चालवू. निधी कसा आणायचा हे आम्हाला माहित आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. बीडचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नियोजनातून जन सन्मान यात्रेचे गुरुवारी (दि.29) आगमन झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर अजित पवार हे बोलत होते. व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, आ.विक्रम काळे, प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, मा.आ.जनार्दन तुपे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, जयसिंग सोळंके, प्रदेश उपाध्यक्ष पापा मोदी, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रज्ञा खोसरे, मोहनराव ढाकणे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, रेखा फड, युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, अल्पसंख्याक महिला जिल्हाध्यक्ष शाकेरा शेख, जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, सुभाष सपकाळ, लीगल सेल जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवक जिल्हाध्यक्ष सुशांत पवार, विद्यार्थी शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अजिंक्य आनेराव, सामाजिक न्याय सेलचे जिल्हाध्यक्ष आनंद सरपते, स्वयंरोजगार जिल्हाध्यक्ष विजय पोकळे, ग्रंथालय सेलचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ, युवक तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे यांच्यासह राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे प्रदेश, जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले की, हे राज्य सामान्यांचं, गरिबांच आहे. आमच्या योजनांची किंमत गरिबांनाच कळेल. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेल्यांना हे कळणार नाही. परळीत धनंजय मुंडे यांनी कृषी महोत्सव घेतला, तिथं आम्ही कांदा निर्यात बंदी करायची नाही असं सांगितलं. आम्ही बळीराजासाठी, त्याच्या घामाची किंमत मिळावी म्हणून उभे आहोत. महिला अत्याचाराला माफी नाही. दोषी कोणीही असो त्याला सोडणार नाही. आम्ही सत्तेला हपापलेले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दैदीप्यमान आहे. त्यांच्या पुतळ्याच्या बाबतीत जे घडले ते दुर्दैवी आहे. त्या प्रकरणातील दोषींना धडा शिकवू असे ते म्हणाले. मी दहावा अर्थसंकल्प सादर करताना महिलांसाठी विशेष तरतूद करण्याचे ठरविले होते. त्यानुसार माझी लाडकी बहिण योजना राबविली. त्याचा महिलांना लाभ मिळतोय. परंतु विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. परंतु बहिणींना कधी फसवणार नाही. 52 लाख कुटुंबांना 3 गॅस सिलेंडर तुमच्या अकाऊंटला पैसे देणार आहे. थेट खात्यवरच पैसे जात आहेत. शिक्षण घेण्यासाठी मुलींना 100 फी देण्याचा निर्णय घेतला आहे, असेही त्यांनी म्हटले. शासनाच्या अनेक योजनांची तपशीलवार माहिती त्यांनी दिली. याप्रसंगी महायुतीतील घटक पक्ष शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी श्री.पवार यांचा सत्कार केला. प्रास्ताविक डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन शिप्रा मानकर, प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार ॲड.प्रज्ञा खोसरे यांनी मानले. यावेळी महिला भगिनींची लक्षणीय उपस्थिती होती. दरम्यान, सभेनंतर ना.अजितदादांनी डॉ.योगेशभैय्यांच्या कार्यालयास भेट दिली. यावेळी महायुतीच्या काही पदाधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती.



आष्टी येथे मा.आमदार भीमराव धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शना खाली भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन सोहळ्याचे उदघाटन झाले.या वेळी क्रांतिकारी शिक्षक संघटना तर्फे मा.आमदार भीमराव धोंडे साहेब पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला

### येता संकट बाळकावरी १०९८ मदत करी.

## बालकांसाठी चाईल्ड हेल्प लाईन सेवा संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर, दि.29 :- संकटग्रस्त बालकाना २४X७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आली असून सेवेचा लाभ बालक स्वतः घेवू शकतो किंवा इतर कोणीही या सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून संकटग्रस्त बालकांना मदत करावी असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे, आपल्या आजूबाजूला आपल्याला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचार ग्रस्त बालके, हरवलेली बालके तसेच सापडलेली बालके, मदतीची आवश्यकता असलेली संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरित आवश्यक मदत कोठून व कशी मिळवून देता येईल, या करिता कोठे संपर्क करावा या बाबते सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो. अशा संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीसाठी भारत सरकार, महिला व बाल विकास विभाग नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग यांच्यामार्फत ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्प लाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकाना २४X७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. सदर सेवेचा लाभ बालक स्वतः घेवू शकतो किंवा इतर कोणीही सदर सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून संकटग्रस्त बालकांना मदत करावी असे आवाहन महिला व बाल विकास विभागाकडून करण्यात आले आहे

## न्याय-मागण्यांसाठी ऊसतोड कामगार पुन्हा उपोषणाच्या पवित्र्यात

### राष्ट्रीय शिवशाहू ऊसतोड कामगार संघटनेचा राज्य साखर आयुक्त कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

**बीड (प्रतिनिधी)**-गेली अनेक दशकांपासून ऊसतोड कामगारांचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न प्रलंबित असून त्या संदर्भात पांडूरंग आंधळे हे गेली दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत मात्र शासन व साखर आयुक्त कार्यालयाकडून जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे त्यामुळे न्याय मागण्यांसाठी ऊसतोड कामगार पुन्हा उपोषण करण्याच्या पवित्र्यात असल्याचे पत्रकाद्वारे प्रदेशाध्यक्ष पांडूरंग आंधळे यांनी कळविले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ऊसतोड कामगाराच्या मुलभूत मागण्यांसाठी अनेक आंदोलने झाली, जिल्हाधिकारी कार्यालय बीड आझाद मैदान मुंबईपर्यंत आंदोलनाद्वारे लढा उभारला परंतू साखर आयुक्त कार्यालयाकडून कसलीही दखल घेतली नाही. गतवर्षी दि.16/10/2023 ते 23/10/2023 पर्यंत बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. यावेळी साखर सहसंचालक छत्रपती संभाजीनगर यांनी प्रतिनिधी पाठवून राज्य साखर आयुक्तांकडे पाठपुरावा करुन मागण्या मान्य करुन घेऊ असे लेखी पत्र दिले त्यामुळे उपोषण तातुरते स्थगित करण्यात आले. मात्र जवळपास दहा महिन्यांचा कालावधी लोटला तरी पण एकही मागणी पदरात पडली नाही. ऊसतोड कामगारांच्या मागण्या अशा की, 1) ऊसतोडणी कामगारांच्या दरवाढीचा करार प्रतिवर्षी करण्यात यावा., 2) ऊसतोड कामगारांच्या मजुरीची रक्कम कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी., 3) ऊस वाहतुक दरात दुप्पट वाढ करण्यात यावी., 4) ऊसतोडणी भरणीचा दर प्रती टन रक्कम रुपये 500/- करावा.,5) ऊसतोडणी कामगारांची नोंदणी साखर खारखान्यांवर करुन ओळखपत्र देण्यात यावीत. ,6) ऊसतोडणी कालावधीत कामावर असताना प्रसुती होणाऱ्या महिलांच्या खात्यावर 30 दिवसात रक्कम रुपये 25,000/- सानुग्रह अनुदान जमा करण्यात यावे., 7) ऊसतोडणीचा करार थेट साखर कारखाना ते ऊसतोड कामगार असा करावा., 8) गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत बेघर ऊसतोड कामगारांना जीजाई घरकुल योजनेअंतर्गत प्रति घरकुल



रक्कम रुपये 4,00,000/- (चार लक्ष) रुपये देण्यात यावेत., 9) छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री संत सेवालाल महाराज व श्री संत भगवान बाबांच्या जयंती दिनी साखर कारखाने बंद ठेवुन एक दिवशीय सुट्टी जाहीर करण्यात यावी., 10) ऊस तोडणीसाठी निघताना प्रती कोयता दोन क्वींटल बाजरी, मजबुत निवारा करण्यासाठी ताडपत्री व सौर दिवा देण्यात यावा., 11) दिनांक 13/04/2015 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली 20 टक्के दरवाढ तात्काळ देण्यात यावी., 12) गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय बीड मध्ये सुरु करावे. तरी मा. साहेबांना विनंती की, वरील मागण्या मान्य होईपर्यंत राष्ट्रीय शिवशाहू कामगार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष लोकनेते बाळासाहेब मोरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील साखर आयुक्त कार्यालयासमोर दिनांक 23/09/2024 पासुन आमरण उपोषण करण्याचा इशारा प्रदेशाध्यक्ष पांडूरंग आंधळे यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077